# संजीव वेरेकर यांच्या साहित्यावर रविवारी चर्चासत्राचे आयोजन

पणजी : कोकणी साहित्यिक स्व. संजीव वेरेकर यांचे समग्र साहित्य आणि व्यक्तिमत्व यावर आधारित 'म्हजे नदरेंतल्यान ' या अनोख्या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. रविवार दि. २७ रोजी सकाळी १० वाजता पणजीतील मिनेझीस ब्रागांझा संस्थेच्या सभागृहात हा कार्यक्रम होणर आहे. नवी दिल्लीतील साहित्य अकादमी, इन्स्टिट्यूट मिनेझीस ब्रागांझा आणि कोंकणी लेखक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. त्यात प्रसिद्ध साहित्यिक लोकवेद संशोधक डॉ. जयंती नायक या स्व. वेरेकर यांचे समग्र साहित्य आणि व्यक्तिमत्व यावर बोलणार आहेत. स्व. वेरेकर यांचे चाहते, साहित्यिक, महाविद्यालयीन विद्यार्थी आणि मित्र परिवाराने उपस्थिती लावून कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.